Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XII Dec. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# "अंबड शहरातील मानव विकास अंतर्गत स्थापन केलेल्या 'विज्ञान बालभवन' भेटीतून विज्ञान शिक्षकाच्या अध्यापनात झालेला बदल - एक अभ्यास"

**डॉ.दादाराव रामजी चव्हाण**
प्राचार्य, ओमशांती अध्यापक महाविदयालय
अंबड, ता.अंबड, जि.जालना

**प्रास्ताविक :-**

स्वातंत्र्योत्तर काळानंतर शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यासाठी विविध योजना, समित्या व आयोग नेमण्यात आले. या विविध समित्या आयोगाच्या शिफारशी वरून शैक्षणिक धोरणे निश्चित केली गेली. शैक्षणिक धोरणातून प्राथमिक स्तरापासूनच विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी कृतीकार्यक्रम तयार करण्यात आलेले आहेत.

बदलत्या काळानुरूप देशाचा विकास करण्यासाठी शिक्षण क्षेत्राचे योगदान लक्षात घेता महत्वाच्या विषयासंदर्भात भरीव कार्य करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अंतर्भूत दहा गाभाभूत घटकापैकी वैज्ञानिक दृष्टिकोन या गाभाभूत घटकाचा समावेश केला गेला आहे. विविध राष्ट्रांनी विज्ञान या विषयाच्या ज्ञानाच्या जोरावर, औदयोगिकी करणावर भर देवून देशाचा विकास घडवून आणला. देशाची औदयोगिक प्रगती करण्यासाठी, तंत्रज्ञान निर्माण करण्यासाठी विज्ञान विषयाचे ज्ञान रूजविण्यासाठी प्रत्येकाकडे वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक आहे. किंबहूना हे परस्पर पुरक आहे.

भारतात स्वातंत्र्यापूर्वी विज्ञान विषयाचे महत्व केवळ शहरातील व्यक्तीनांच माहित होते. परंतु केवळ मोजक्याच लोकांना विज्ञानाचे ज्ञान देवून चालणार नाही. खेडयापाडयापर्यंत हा विषय पोहोचला पाहिजे. खेडयातील शाळातून विज्ञान विषयाबददल विदयार्थी, शिक्षक, यांना अदयावत माहिती मिळावी व वैज्ञानिक दृष्टिकोनाची रूजवणूक प्रभावी व्हावी या उददेशाने मानव विकास कार्यक्रम सन २०११-१२ अंतर्गत जिल्हातील प्रत्येक तालुक्यात विज्ञान बालभवन ची निर्मिती करण्यात आली. सन २०११-१२ पासून निर्माण झालेल्या या विज्ञान बालभवन भेटीतून अंबड तालूक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या विज्ञान विषय अध्यापनात झालेल्या बदलाचा पाहणीकरीता सदरील संशोधन करण्यात येत आहे.

- **संशोधनाची गरज :-** दहा गाभाभूत घटकापैकी वैज्ञानिक दृष्टीकोन विदयार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी व प्राथमिक स्तरापासूनच विज्ञान विषयातील अभिरुची वाढविण्यासाठी मानव विकास मिशन अंतर्गत सन २०११-१२ मध्ये तालुकास्तरावर विज्ञान बालभवनाची निर्मिती झालेली आहे. त्यानुसार प्राथमिक स्तरावरील विज्ञान शिक्षकाच्या अध्यापनात त्याचा किती फायदा होतो हे पाहण्यासाठी हे सदरील संशोधन करणे गरजेचे आहे.
- **संशोधनाचे महत्त्व :-**मानव विकास मिशन अंतर्गत सन २०११-१२ मध्ये तालुकास्तरावर निर्माण करण्यात आलेल्या विज्ञान बालभवनाचा प्राथमिक स्तरावरील विज्ञान विषय शिक्षकास कितपत फायदा झाला हे पडताळून पाहण्यासाठी सदरील संशोधन महत्त्वाचे आहे.
- **संशोधनाची उद्दिष्टये :-**
  १) मानव विकास अंतर्गत स्थापन केलेल्या विज्ञान बालभवनाची उपयुक्तता अभ्यासणे
  २) मानव विकास अंतर्गत स्थापन केलेल्या विज्ञान बालभवनाची शिक्षकांमध्ये झालेली जाणीव जागृती अभ्यासणे.

३) मानव विकास अंतर्गत स्थापन केलेल्या विज्ञान बालभवनामुळे विज्ञान शिक्षकामध्ये विज्ञान अध्यापनाविषयी झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

- **संशोधनाची गृहितके :-**

  **१)** विज्ञान बालभवनामुळे शिक्षकाच्या विज्ञान विषयाच्या अध्यापनात परिणामकारक बदल होतो.

  **२)** विज्ञान बालभवन विदयार्थ्याच्या विज्ञान विषयातील गुणात्मक वाढीसाठी उपयुक्त आहे.

- **संशोधनाची व्याप्ती :-** सदरील संशोधन हे अंबड शहरातील प्राथमिक स्तरावर विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राथमिक शिक्षकापुरते व्यापक आहे.
- **संशोधनाची मर्यादा :-** सदरील संशोधन हे अंबड शहरातील केवळ मराठी माध्यमाच्या प्राथमिक स्तरावरील विज्ञान विषयाच्या शिक्षकापुरते मर्यादित आहे.
- **संशोधन कार्यपद्धती :-** सदरील संशोधनासाठी सर्वेक्षण या संशोधन पदधतीचा अवलंब करण्यात आला आहे.
- **न्यादर्श :-** अंबड शहरातील केवळ मराठी माध्यमाच्या प्राथमिक स्तरावर विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या १० शाळातील प्राथमिक शिक्षकांना न्यादर्श म्हणून निवडण्यात आले आहेत.
- **संशोधनाची साधने :-** सदरील संशोधनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली आहे.
- **संशोधनाचे निष्कर्ष :-**

  १) मानव विकास अंतर्गत स्थापन झालेले विज्ञान बालभवन शिक्षकासाठी उपयुक्त आहे असे मत १००% शिक्षकांनी मांडलेले आढळून आले.

  २) १००% शिक्षकांच्या मते, मानव विकास अंतर्गत स्थापन झालेल्या विज्ञान बालभवनात दाखविण्यात आलेल्या प्रयोगातून शिक्षकांना विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यास मदत होते.

  ३) मानव विकास अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या विज्ञान बालभवनास नियमित भेट दिल्याने विषय अध्यापनास योग्य दिशा मिळते असे मत ९५% शिक्षकांनी मांडलेले आढळून आले.

  ४) १००% शिक्षकांच्या मते, मानव विकास अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या विज्ञान बालभवनाच्या माध्यमातून ज्ञानरचना वादास प्रोत्साहन मिळते.

  ५) १००% शिक्षकांच्या मते, प्राथमिक स्तरापासून विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यास करण्यास मानव विकास अंतर्गत स्थापन करण्यात आलेले विज्ञान बालभवन उपयुक्त आहे.

  ६) ८५% शिक्षकांच्या मते, मानव विकास अंतर्गत स्थापन झालेल्या विज्ञान बालभवनाने प्रेरीत होऊन शाळास्तरावर विज्ञान कोपरा हा उपक्रम सुरू करण्यास मदत मिळाली तर १५% शिक्षकांनी विज्ञान कोपरा उपक्रम सुरू करण्यासाठी उत्सुक असल्याचे मत मांडले.

**शिफारशी :**

१. विज्ञान बालभवनाची केंद्रनिहाय निर्मिती करावी.
२. ग्रामीण भागात काही शाळांचा समूह करून एक विज्ञान भवनाची निर्मिती करावी.
३. विज्ञान बालभवनाच्या विज्ञान शिक्षकांनी प्रत्येक महिन्यातून विदयार्थ्यासह एक भेट दयावी.
४. विज्ञान बालभवनासाठी कायम निदेशकाची नेमणूक करावी.
५. विज्ञान बालभवनाची व्याप्ती वाढवून माध्यमिक स्तरावरही अंमलबजावणी करावी.
६. विज्ञान बालभवन संचालनासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी.
७. विज्ञान बालभवनास भेटी साठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करावी.